जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २८८ दिनांक - १३/०७/२०२४**

युनिट १ गुन्हे शाखा पुणे शहर

# घरफोडी करणारा सराईत गुन्हेगारास केले ४८ तासामध्ये जेरबंद

यातील फिर्यादी रा.कर्वेरोड पुणे यांचे रहाते घर दिनांक ०७/०७/२०२४ रोजी रात्रौ.१९/१५ वा ते दिनांक ०८/०७/२०२४ रोजी सकाळी ११/०० वा.चे दरम्यान बंद असताना कोणी तरी अज्ञात चोरट्याने घराचे खिडकीचे गज वाकवुन त्यावाटे घरात प्रवेश करून सोन्याचे दागिने,हिरेजडीत दागिणे व रोख रक्कम असे अंदाजे १३,८४,०००/-रु.किं.चा माल घरफोडी चोरी करून नेला म्हणुन दिलेल्या तक्रारी वरून डेक्कन पो.स्टे.येथे गु.र.नं.१०५/२०२४,भा.न्या.सं.२३ चे कलम ३३१(३),३३१(४),३०५(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहराचे मध्यवर्ती भागामध्ये घरफोडी चोरी सारखा गुन्हा घडल्याने मा.वरिष्ठांनी गुन्हा उघडकीस आणणेबाबत योग्य त्या सुचना दिल्या.त्याप्रमाणे मा.वपोनि शब्बीर सय्यद यांनी घटना स्थळापासुन विवीध भागातील सी.सी.टी.व्ही. फुटेज पहाणे कामी युनिट-१ कडील पोलीस अंमलदार यांची दोन तपास पथके तयार करुन त्यांना सुचना व मार्गदर्शन करुन रवाना केले असता, प्राप्त झालेल्या सी.सी.टी.व्ही फुटेजची पहाणी करीत असताना **पोलीस अंमलदार निलेश साबळे व दत्ता सोनावणे** यांनी सदरची घरफोडी चोरी करणारा इसम हा घरफोडीच्या गुन्ह्यातील रेकॉर्डवरील आरोपी नामे अल्लाबक्ष पिरजादे रा.२१७ मंगळवार पेठ पुणे हा असल्याचे लक्षात आल्याने मा.वरिष्ठांचे आदेशाने युनिट-१ चे सर्व पथकाने वर आरोपीचा शोध घेण्यास सुरू करुन त्याचे रहाते घराजवळ कोंबडीपुल शिवाजी आखाडाजवऴ मंगळवार पेठ पुणे येथे सापळा रचुन दबा धरुन थांबले.सदर आरोपी हा कोंबडीपुल शिवाजी आखाडाजवऴ मंगळवार पेठ पुणे येत असल्याचे दिसताच तो आम्हाला पाहुन पळु लागल्याने त्याचा पाठलाग करुन वरील नमुद पोलीस स्टाफचे मदतीने ताब्यात घेतले.सदर आरोपीस त्याचा नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव पत्ता **अल्लाबक्ष महंमद पिरजादे वय ३५ रा.रेल्वे भराव,२१७ मंगळवार पेठ पुणे** असे असल्याचे सांगितले.त्याचेकडे दाखल गुन्ह्याचे अनुशंगाने विचारणा केली असता तो प्रथम उडवा उडवीची व असमाधानकारक माहीती देवु लागला. त्यामुळे त्याचेकडे अधिक विश्वासात घेवुन व त्यास प्राप्त सीसीटीव्ही फुटेज दाखविले असता त्याने सांगितले की,दिनांक ०७/०७/२०२४ रोजी रात्रौ ०७.३० वा ते पहाटे ०४.०० वा.चे सुमारास त्याने दाणी बंगला,कर्वे रोड पुणे येथील बंगल्याचे कंपाउंड भिंतीवरुन आत जावुन सदर बंगल्याच्या खिडकीचे गज त्याचेकडील लोखंडी पाईपच्या सहाय्याने वाकवुन बंगल्यात प्रवेश करुन कात्रीच्या सहाय्याने कपाटाचे लॉक काढुन कपाटातील सोन्याचे दागीने व रोख रक्कम चोरले असुन सदरचे दागीने पुणे मनपा पी.एम.टी डेपो शिवाजीनगर पुणे येथील मेट्रो स्टेशन जिन्याचे लगत नदी पात्रात कंपाउंड लगत एका दगडाखाली

ठेवले असल्याचे सांगितल्याने आरोपीसह सदर ठिकाणी जावून सदरचे घटनास्थळावरून पिशवीमध्ये वेगवेगळ्या वर्णनाचे १७,६४,०६०/-रु किं.चे दाखल गुन्ह्यातील २० तोळे वजनाचे हिरेजडीत सोन्याचे दागीने व ८०००/- रु.रोख रक्कम असा एकुण १७,७२,०६०/-रु.किं.चा माल ताब्यात घेण्यात आला असून आरोपीस पुढील कारवाईकामी डेक्कन पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे, पुणे शहर,श्री.अमोल झेंडे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, पुणे शहर,श्री.गणेश इंगळे, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक युनिट ०१,श्री.शब्बीर सय्यद सहा.पो.निरी आशिष कवठेकर, पोलीस अंमलदार निलेश साबळे,दत्ता सोनवणे,शशीकांत दरेकर,अभिनव लडकत,महेश बामगुडे,आण्णा माने,राहुल मखरे,अय्याज दड्डीकर,प्रफुल शेलार,रूक्साना नदाफ यांनी केली आहे.

